इंटरनॅशनल स्विमिंग स्पर्धेत सर्वेश गुरवचे यश

" मानवी जीवनात बौद्धिक व मानसिक विकासाबरोबर शारीरिक विकास देखील तितकाच महत्त्वाचा असतो. म्हणून विद्यार्थ्यांनी शालेय जीवनामध्येच खेळाकडे वळणे गरजेचे आहे. आज खेळामधील करिअर देखील तितकेच महत्त्वाचे झाले आहे. विद्यार्थ्यांनी वेळीच आपले अंगभूत कौशल्य ओळखून त्याच खेळात करिअर घडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे." असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. ए.माने यांनी केले. ते सर्वेश विजय गुरव यांनी स्विमिंग इंटरनॅशनल स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल आयोजित करण्यात आलेल्या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. श्री वेंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथील बी.कॉम. भाग दोन मध्ये शिकत असलेल्या सर्वेश विजय गुरव यांनी आशियाई खुल्या शालेय जलतरण निमंत्रित स्पर्धेमध्ये वेगवेगळ्या गटात पदके प्राप्त केली. या स्पर्धा थायलंड या देशातील बँकॉक येथे पार पडल्या. 20 देशाहून अधिक स्पर्धकांनी या मध्ये सहभाग नोंदविला. स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन मार्फत त्याची निवड करण्यात आली होती. त्याने 25 मीटर बटरफ्लायमध्ये गोल्ड मेडल, 100 मीटर बटरफ्लायमध्ये सिल्वर मेडल, 200 मीटर बटरफ्लाय मध्ये सिल्वर मेडल तर 200 मीटर आय. एम. मध्ये ब्रॉंझ पदक प्राप्त केले. 17 व 18 ऑगस्ट 2024 मध्ये या स्पर्धा थायलंड येथे पार पडल्या. या यशाबद्दल महाविद्यालयामध्ये त्याच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने, शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमिन बाणदार, ग्रंथपाल श्री. एम.पी.केसरकर, अधीक्षक अनोष गायकवाड, लिपिक महेश चौगुले व ग्रंथपाल परिचर शशांक कवडगे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.